



RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com




❑ वर्ष - २ रे ❑ अंक -८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२३ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राम मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी, रात्रीपासूनच अयोध्या धाममध्ये लांबच लांब रांगा : देशात आली राम लहर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील मंदिरामध्ये रामचंद्राच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांना उद्देशून केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी 'देवापासून देशाकडे' आणि 'रामापासून राष्ट्राकडे' असा नवा मंत्र दिला. दरम्यान, प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर भगवान श्रीरामाच्या दर्शनासाठी अयोध्याधाममध्ये लोकांची गर्दी होऊ लागली आहे. अयोध्येला पोहोचणाऱ्या हजारो भाविकांना कोणत्याही मार्गाने लवकरात लवकर मंदिरात पोहोचून श्रीरामाचे दर्शन घ्यायचे आहे.

मंगळवारी (२३ जानेवारी) सकाळपासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. काल रात्री उशिरापासूनच राम मंदिराच्या मुख्य गेटबाहेर भाविकांची मोठी रांग लागली होती. पहाटे २ वाजल्यापासून येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली. गर्दीत उपस्थित लोक गेटसमोर 'जय श्री राम'चा जयघोष करत मंदिरात प्रवेश करत आहेत. देशभरातून भाविक अयोध्येत श्रीरामाच्या दर्शनासाठी येत आहेत. यासोबतच अयोध्येतील स्थानिक रहिवासीही राम मंदिरात दर्शन आणि पूजेसाठी पोहोचत आहेत.



दरम्यान, राम मंदिराच्या उद्घाटनाच्या जवळपास दोन आठवड्यांपूर्वी अयोध्येतील हॉटेल बुकिंग ८० टक्क्यांनी वाढले आहे. येथे हॉटेलमधील एका दिवसाच्या खोलीची किंमत सर्वकालीन उच्च दरावर पोहोचली आहे, जी पाच पटीने वाढली आहे. काही आलिशान खोल्यांचे भाडे एक लाख रुपयांपर्यंत गेले आहे. विशेष म्हणजे भाड्यात एवढी वाढ होऊनही हॉटेल बुकिंग दररोज वाढत आहे.

याचबरोबर, अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनानंतर हे शहर आता देशातील सर्वात मोठे धार्मिक पर्यटन केंद्र होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या शहराला वर्षाला किमान पाच कोटी पर्यटक भेट देऊ शकतात, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. अमृतसर येथील सुवर्ण मंदिर आणि तिरुपती बालाजी मंदिरापेक्षाही अयोध्येतील राम मंदिरात अधिक भाविकांचा ओघ असण्याची शक्यता आहे.श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या २ आठवडे आधी अयोध्येतील सर्व हॉटेल्समध्ये ८० टक्के बुकिंग्स झाले आहेत. येथील हॉटेलांमध्ये एक दिवस राहण्यासाठी पाच टक्के अधिक पैसे द्यावे लागत आहेत. काही आलिशान खोल्यांच्या किंमती १ लाखांपर्यंत गेल्या आहेत.

मंदिराबाहेर भक्तांची इतकी गर्दी जमली आहे की, अनेक ठिकाणी डिव्हाईडर तुटले आहेत, बेरिकेट्स मोडले आहेत. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ लागली आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी अधिक पोलीस कुमक अयोध्येत बोलावण्यात आली आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी अतिरिक्त पोलीस महासंचालक सुजीत पांडेय यांनादेखील सकाळी अयोध्येत यावं लागलं. पांडेय म्हणाले, सध्या परिस्थिती आमच्या नियंत्रणात आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी अधिक पोलीसफाटा तैनात करण्यात आला आहे.

## रोहित पवारांना आजोबा, आत्याची साथ; सुळे म्हणाल्या- लढेंगे और जितेंगे

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार हे कंपनीच्या साखर कारखाना खरेदी व्यवहार प्रकरणी ईडीच्या रडारवर आहेत. दरम्यान चौकशीसाठी उद्या बुधवारी (२४ जानेवारी) रोहित पवारांना हजर राहावे लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांच्या आत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्वीट करत भाचा रोहित पवारांना साथ दिली आहे. तर चौकशीच्या दिवशी आजोबा शरद पवार ईडी कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर पक्ष कार्यालयात तळ ठोकून असणार आहेत.

भाजपाचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी कन्नड सहकारी साखर कारखान्यासंदर्भात ईडीकडे तक्रार दाखल केली होती. राज्य सहाकारी बँकेच्या लिलावामध्ये हेरफेर करत ने हा साखर कारखाना ५० कोटी रुपयांना विकत घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या ही कंपनी आमदार रोहित पवार यांची आहे. जवळपास १५ दिवसांपूर्वीच ईडीने या कंपनीसह सहा ठिकाणी ईडीने छापेमारी केली



होती. त्यानंतर आता आमदार रोहित पवार यांना समन्स बजावून २४ जानेवारी रोजी हजर राहण्यास सांगितले आहे.उद्या होणाऱ्या चौकशीआधी आमराद रोहित पवार यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंट ट्वीटरवर कुणापुढंही न झुकता महाराष्ट्राचा स्वाभिमानी बाणा टिकवायचाय आणि महाराष्ट्र धर्म जपायचाय! अशा आशयाचं ट्वीट केलं आहे.

## लग्न एकाबरोबर, संसार दुसऱ्याबरोबर अन् हनीमून; मुख्यमंत्री शिंदेंचा ठाकरेंवर हल्ला

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शिवसेना ठाकरे गटाचे राज्यव्यापी अधिवेशन नाशिकमध्ये सुरू असून, या अधिवेशनातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी भाजपसह शिंदे गटावर जोरदार हल्ला केला. शिवसेना पळविणाऱ्याचा मी वध करणार असल्याचेही ते म्हणाले. त्यांच्या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. निवडणूक एका बरोबर लढायची आणि सत्ता दुसऱ्या बरोबर म्हणजेच लग्न एकाबरोबर, संसार दुसऱ्याबरोबर अन् हनीमून तिसऱ्याबरोबर हे असले धंदे ज्यांनी केले त्यांना असं बोलण शोभत नाही अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदेंनी ठाकरेंवर हल्लाबोल केला.



आज दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांची ९८वी जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवाजी पार्कमधील स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृतीस्थळावर जाऊन त्यांना अभिवादन केलं. यावेळी त्यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, उद्धव ठाकरेंना रामाने सद्बुद्धी द्यावी. एवढंच मी म्हणेन. कारण आपल्या अहंकारापोटी बाळासाहेबांचे विचार ज्यांनी विकले. बाळासाहेबांच्या विचारांना ज्यांनी खुर्चीपायी, मोहापायी बाळासाहेबांनी दूर ठेवलेल्या काँग्रेसला मांडीवर घेतलं, काँग्रेसला डोक्यावर घेतलं, या कोट्यवधी महाराष्ट्रातील जनतेबरोबर विश्वासघात केला, बेईमानी केली अन निवडणूका एकाबरोबर, लग्न एकाबरोबर, संसार दुसऱ्याबरोबर, हनीमून तिसऱ्याबरोबर हे असले धंदे ज्यांनी केले, त्यांनी अशा प्रकारचं बोलणं त्यांना शोभत नाही, त्यांच्या अहंकारामुळे, हे राज्य मागे गेलं, आम्ही सरकार पलटवून टाकलं, ते या राज्याच्या विकासासाठी आणि या राज्याती जनतेच्या मनातील, स्वप्नपूर्तीसाठी. त्यामुळे आज त्यांनी सर्व प्रकल्प बंद केले होते, ते आम्ही सुरू केले, त्याला चालना दिली. हे राज्य पुढं जातेय, या राज्याचा विकास होतोय आणि केंद्र सरकार देखील याला पाठबळ देत आहे.

### त्यांनी आत्मपरीक्षण करावं

पंतप्रधान नरेंद्र मोदी या सरकारच्या मागे ठामपणे उभे राहिलेले आहेत. म्हणून दावोसमध्ये जवळपास ३ लाख ५६ हजार कोटींची परदेशी गुंतवणूक आपल्या राज्यात आली. तीन लाखापेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळणार आहे. हे या राज्याचं काम आहे. हे बाळासाहेबांवर अभिप्रेत असं काम आहे. त्यामुळे त्यांनी बोलताना आत्मपरीक्षण करावं आज त्यांच्यावर ही वेळ का आली? याचं आत्मचिंतन करावं. त्यांना लोकं सोडून का जाऊ लागले? याचा त्यांनी विचार करावा. एका खुर्चीसाठी, एका सत्तेच्या खुर्चीसाठी मोहापायी त्यांनी व्यभिचार त्यांनी केला. विचार सोडले आणि त्याचं काय फळ मिळालं हे सगळ्यांसमोर आहे. आम्ही शिवसेना म्हणून बाळासाहेबांना अभिप्रेत असलेलं काम करतोय असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

## रामललांची दिवसातून ६ वेळा होणार आरती सहभागी होण्यासाठी काय करावं लागेल?

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. या भारावून टाकणाऱ्या सोहळ्याने देशभरातील नागरिक आनंदित झाले. आपल्या मंदिरात रामलला विराजमान झाल्यानंतर आता सर्वसामान्य नागरिकांसाठीही राम मंदिराचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत. त्यामुळे आपल्या राजाचं दर्शन घेण्यासाठी आजपासून मंदिरात मोठी गर्दी होऊ लागली आहे. अशातच आता मंदिरातील पूजा आणि आरतीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राम मंदिरात प्रभू श्रीरामांची दिवसातून सहा वेळा आरती होणार आहे. सकाळी जागरण आरती होईल, तर सायंकाळी शयन आरती होणार आहे.

प्रभू श्रीरामांच्या आरतीसाठी पास देण्यात येणार आहेत. सर्वसामान्य रामभक्तांसाठी सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत दर्शनासाठी मंदिर खुलं ठेवण्यात येणार आहे. सकाळी साडेसात वाजता रामभक्तांना आतमध्ये प्रवेश मिळेल. दर्शनासाठी दोन स्लॉट करण्यात आले आहेत. पहिला स्लॉट सकाळी साडेसात ते साडेअकरापर्यंत असेल, तर दुसरा स्लॉट दुपारी २ पासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत असणार आहे.



**अशी असेल आरतीची वेळ**

पहाटे ४ वाजता विशेष आरती होईल. त्यानंतर थोड्याच वेळात म्हणजे साडेचार वाजता मंगल आरतीचं आयोजन केलं जाणार आहे. या दोन्ही आरत्यांसाठी भक्तांना उपस्थित राहता येणार नाही. सकाळी साडेसहा वाजता मुख्य आरती घेण्यात येणार आहे. या आरतीला रामभक्तांना उपस्थित राहता येईल. त्यासाठी एक दिवस आधी पास घ्यावा लागेल. सायंकाळी होणाऱ्या आरतीची वेळ ही सात वाजता असेल. या आरतीसाठीचं बुकिंग दर्शनाच्या दिवशीच करता येईल.

दरम्यान, आरतीत सामील होण्यासाठी भक्तांना ऑनलाइन आणि ऑफलाइन पास उपलब्ध करण्यात आले आहेत. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या www.srjbtkshetra.org या वेबसाइटवरून ऑनलाइन पास मिळू शकेल. तर दर्शनासाठी भक्तांना कोणत्याही रजिस्ट्रेशनची गरज भासणार नाही.

## परवानगी नाही दिली तरी उपोषणाला बसणार मुंबईच्या आंदोलनावर जरांगे ठाम

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठीचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांना मुंबईतील मोर्चाचा निर्णय मागे घेण्याचे आवाहन केले होते. मात्र, जरांगे पाटील यांनी २० जानेवारी रोजी अंतरावाली सराटीतून पुन्हा एकदा आरक्षणाच्या लढाईला सुरूवात केली असून अहमदनगरमार्गे ते मुंबईला जात आहेत. आज जरांगेंचा ताफा पुण्यात पोहोचला असून उद्या पिंपरी चिंचवडमध्ये मुक्कामी असणार आहे. तत्पूर्वी सरकारकडून विविध अधिकारी पाठवून त्यांची समजूत घातली जात आहे.

जरांगे-पाटील यांची पदयात्रा बुधवारी सकाळी सांगवी फाटा येथे दाखल होणार आहे. रक्षक चौक,जगताप डेअरी, काळेवाडी फाटा, डांगे चौक, पदमजी पेपर मिलमार्गे चापेकर चौक चिंचवडगाव असा मार्ग असणार आहे. पुढे चिंचवड स्टेशन- खंडोबा मंदिर, आकुर्डीमार्गे निगडी, भक्ती-शक्ती समूह शिल्पावरून तळेगावमार्गे आंदोलक लोणावळा येथे मुक्कामी जाणार आहेत. तत्पूर्वी सरकारकडून त्यांची रॅली थांबवण्यासाठी समजतू घातली जात आहे. पुण्याजवळ आले असता सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना आपला निर्णय बदलण्याची विनंती केली. मात्र, आपण निर्णयावर ठाम असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं.

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची पदयात्रा रांजणगावहून निघून नगररोडने कोरेगाव भिमामार्गे खराडीत मुक्काम केला. तेथून ही पदयात्रा खराडी बायपास- पुणे स्टेशन- औंध



गाव- रक्षक सोसायटी - काळेवाडी फाटा - डांगे चौक - चिंचवड स्टेशन - आकुर्डी - निगडी देहूरोड -(जुना एक्सप्रेस वे ने)- लोणावळा मुक्कामी जाणार आहे. जरांगेंच्या या रॅलीला मराठा समाजाचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून त्यांच्या रॅलीतील सहभागी मराठ्यांच्या राहण्यासाठी, जेवणासाठी व इतर गोष्टींसाठी नियोजन केलं जात आहे. जरांगे पाटील आज पुण्यात आले असून उद्या पुण्यातून मुंबईकडे निघणार आहेत. तत्पूर्वी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसोबत आजच चर्चा करणार आहेत, त्यामुळे आपण आपल्या निर्णयावर विचार करावा, अशी विनंती संबंधित अधिकाऱ्यांकडून जरांगेंना करण्यात आली. मात्र, आपण आपल्या निर्णयावर ठाम आहेत. दोन दिवसांत मराठा आरक्षण न मिळाल्यास २६ जानेवारीपासून आपण आमरण उपोषणाला बसणार आहेत. सरकारने परवानगी दिली तरी, आणि नाही दिली तरी आपण उपोषणाला बसणार असल्याचं जरांगे यांनी सांगितले. त्यामुळे, जरांगे हे त्यांच्या उपोषणाच्या निर्णयावर ठाम असल्याचं स्पष्ट झालं आहे.

## शिवसेनेचा सौदा करणाऱ्यांच्या हस्ते अयोध्येत रामाची प्राणप्रतिष्ठा, ठाकरे गटाचा आरोप

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

संपूर्ण देश राममय झाला असताना हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिन आज साजरा होत आहे. पण, 'शिवसेनाप्रमुख' या पदातील शिवसेना पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भारतीय जनता पक्षाने सध्या महाराष्ट्रद्रोही गुलामांच्या हाती सोपवली आहे. सत्तेच्या क्षणिक तुकड्यांसाठी 'आई'चा सौदा करावा, तसा शिवसेनेचा सौदा ज्यांनी केला त्यांच्या हस्ते अयोध्येत रामाची प्राणप्रतिष्ठा झाली, हे बरे नाही, असे टीकास्त्र ठाकरे गटाने सोडले.



शिवसेनाप्रमुखांचे अस्तित्व हे सत्य आणि नैतिकतेच्या राजकारणाचे बलस्थान होते. आज आपल्या देशातून सत्य आणि नैतिकतेचे उच्चाटन झाले आहे. राष्ट्रभक्तीचा गोवर्धन करंगळीवर पेलून धरायला शिवसेनाप्रमुख नाहीत. पण छत्रपती शिवाजी महाराजांनंतरही महाराष्ट्र मोगलांशी लढत राहिला आणि शेवटी औरंगजेबाला याच मातीत गाडले. शिवसेनाप्रमुखांच्या महानिर्वाणानंतरही महाराष्ट्र लढतच आहे आणि महाराष्ट्राचे लचके तोडणाऱ्या नव्या मोगलांना तो याच मातीत गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सामना दैनिकातील अग्रलेखातून दिला आहे.

शिवसेनाप्रमुख ही पदवी किंवा उपाधी नव्हती, तर ते एक तेजोवलय होते. सत्तेपेक्षा संघटनेचे बळ किती मोलाचे आणि संघटनेत काम करणाऱ्या शिवसैनिकांच्या निष्ठा व त्याग किती महत्त्वाचा, हे त्यांनी देशाला दाखविले. लाखो निष्ठावंतांचा सागर त्यांच्या एका इशाऱ्यावर उसळून बाहेर पडत असे आणि देशाच्या राजकारणाची दिशा त्यामुळे बदलत असे. हा इतिहास कधीच पुसला जाणार नाही, असेही ठाकरे गटाने म्हटले आहे.

## प्रजासत्ताक दिनाला शिवरायांच्या राज्यकारभारावर आधारित चित्ररथ, यवतमाळच्या पाटणबोरीत साकारली शिल्पकृती

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ**

प्रजासत्ताकदिनी दिल्लीच्या कर्तव्यपथावर यंदा 'भारतीय लोकशाहीचे प्रेरणास्थान : छत्रपती शिवाजी महाराज' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ पाहायला मिळणार आहे. शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल हा चित्ररथ राहणार आहे. महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवरील पाटणबोरी (ता. पांढरकवडा) येथील तरुणांनी केवळ दहा दिवसांमध्ये या चित्ररथातील शिल्प पाटणबोरी या गावात साकारले.

या चित्ररथाची पहिली झलक आज मंगळवारी कर्तव्यपथावरील (दिल्ली) तालमीमध्ये अवघ्या देशाला पाहायला मिळाली. चित्ररथ साकारणाऱ्या कलावंतांमध्ये एकूण ३० कलावंतांचा सहभाग असून यात यवतमाळ जिल्ह्यामधील कलावंतांचा मोठा वाटा आहे. हा चित्ररथ साकारताना तुषार प्रधान (यवतमाळ) आणि रोशन इंगोले (वर्धा) यांनी कला दिग्दर्शकाची जबाबदारी सांभाळली. तर, यवतमाळ जिल्ह्यातील प्रसिद्ध



शिल्पकार यशवंत एनगुर्तीवार (पाटणबोरी) हे शिल्पकला विभागाचे प्रमुख आहेत. जिल्ह्यातील कलावंतांनी तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या पाटणबोरी येथे यशवंत यांच्या स्टुडिओमध्ये या चित्ररथातील शिल्प साकारले आहे.

## संपादकीय ......

# देशभरातील बाजारामध्येही कमालीची उलाढाल

अयोध्येमधील प्रभू श्री रामललाच्या मंदिरामध्ये होणारा ऐतिहासिक प्राणप्रतिष्ठा सोहळा अवघ्या देशाने आनंदामध्ये साजरा केला. या क्षणाचा साक्षीदार होणाऱ्या प्रत्येक भक्ताच्या मनामध्ये समाधान व्यक्त होत आहे. हा उत्सव साजरा होत असताना देशभरातील बाजारामध्येही कमालीची उलाढाल झाली. प्रत्यक्ष प्राणप्रतिष्ठा होण्याआधी बाजारामध्ये जवळपास एक लाख कोटीपेक्षाही जास्त उलाढाल झाल्याचे कॅटने एका अहवालामध्ये म्हटले आहे. 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडिया ट्रेडर्स' ही किरकोळ व्यापाऱ्यांची संघटना आहे. देशभरात होणाऱ्या किरकोळ व्यापारावर ही संघटना वेळोवेळी अहवाल प्रसिद्ध करीत असते.कॅटचे राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल यांनी देशामध्ये यावेळी जोरदार खरेदी होईल, असा अंदाज आधीच व्यक्त केला होता. हा अभूतपूर्व सोहळा साजरा करण्यासाठी संपूर्ण देशामध्ये कमालीचा उत्साह ओसंडून वाहत होता. २१ व २२ जानेवारी रोजी देशामध्ये विविध ठिकाणी ३० हजारांपेक्षाही जास्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

लाखो शोभायात्रांचे आयोजन करण्यात आले होते. अयोध्येच्या राम मंदिराच्या प्रतिकृतीला संपूर्ण देशामध्ये प्रचंड मागणी असून लोकांचा उत्साह बघता पाच कोटींपेक्षा जास्त मंदिराच्या प्रतिकृती विकल्या जातील, असा अंदाज आहे. त्यामुळे कॅटच्या अंतर्गत येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या हजारो संघटनांनी त्यासाठी फार मोठी तयार केली होती. कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया म्हणाले की, धार्मिक नेत्यांच्या आग्रहास्तव व्यापाऱ्यांनी बैठक घेऊन देशातील संपूर्ण बाजार राममय करून टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे देशभरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल दिसून येते.असा हा रामनामाचा महिमा. या निमित्ताने देशामध्ये लाखो-कोटींची उलाढाल व्हावी; हे वाटते तेवढे सोपे नाही. हे परंपरेने आलेल्या आस्थेचे प्रतीक आहे. भारतीयांच्या या आस्थेने आज रुपयाही खळखळून हसला. ५०० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर संपूर्ण देशाने ऐतिहासिक सोहळा अनुभवला.ज्यांना ज्यांना या सोहळ्याचे साक्षीदार होता आले, ते सर्व स्वतःला भाग्यवान समजत आहेत. भारताच्या मानबिंदूवर आघात करून विदेशी आक्रांतांनी अनेक घाव केले.

रामलला आपल्या जन्मस्थानावर विराजमान झाले. स्वातंत्र्यानंतर त्यास ७५ वर्षे वाट बघावी लागली. लाखो शूरवीर रामभक्तांनी त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यामुळे हा सोहळा साजरा करताना सर्वांनी या बलिदानाची आठवण मनामध्ये कायम कोरून ठेवणे आवश्यक आहे. २०१४ साली झालेल्या परिवर्तनाचे हे फलित आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याची प्रत्येक पहाट उगवण्यासाठी हे परिवर्तन मैलाचा दगड ठरणार आहे. त्याचेही साक्षीदार होण्यासाठी अजूनही प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज आहे.

# विदर्भाच्या नंदनवनात प्रभू श्रीरामाचा गजर

## कृष्ण मंदिर ते राम मंदिर निघाली शोभायात्रा



**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**– अयोध्या येथे प्रभू श्रीराम यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेनिमित्त चिखलदरा तालुक्यात विविध ठिकाणी कार्यक्रमांची रेलचेल होती. पर्यटन नगरी चिखलदरा येथे कृष्ण मंदिर ते राम मंदिरापर्यंत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये चिखलदरा शहरासह शहापूर, आलाडोह, लवादा, तेटू, आमझरी, बोरी, कामापूर, मोथा, मडकी इत्यादी अनेक गावांतील नागरिक सहभागी झाले होते. या रॅलीचे वैशिष्ट्य असे की यामध्ये घोडा,उंट तसेच जिप्सीसुद्धा सहभागी करण्यात आल्या होत्या शिवाय हरिपाठ मंडळआलाडोह तसेच आदिवासी नृत्य करणारे पथकसुद्धा सहभागी झाले होते. यासह भजन मंडळ, हरिपाठ मंडळ, कलश यात्रा यासह माजो नगराध्यक्ष राजेंद्रसिंह सोमवंशी, रूपेश चौबे, मनोज शर्मा, राजेश मांगलेकर, राजू पानोरकर, वेदांत सुपाटणे, महेंद्र पचोरी आशिष चौबे, अरुण सपकाळ, शंकर खडके, हिरूजी हेकडे, बाबू हेकडे, गोपाल खडके, अश्विन मिश्रा, पुरुषोत्तम मिश्रा, कृष्णा खंडेलवाल इत्यादींसह शेकडो पदाधिकारी व नागरिक सहभागी झाले होते. पोलिसांनी ठाणेदार आनंद पिदूरकर यांच्या मार्गदर्शनात चोख बंदोबस्त ठेवला होता.

### मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा आनंद



भीमराव येवले

मेळघाटातून आम्ही काही मोजकेच कारसेवक अयोध्येला गेलो होतो. आमच्या भीमराव येवले समोरच गोळीबार झाला तसेच मी २००३ मध्ये तीन दिवस तसेच २००४ मध्ये सात दिवस अयोध्या येथे सेवा दिली आहे. प्रभू श्रीरामाचे मंदिर व्हावे, ही एकमेव इच्छा आमच्या मनात होती. त्यामुळे आम्ही जीवाची परवा न करता त्याठिकाणी गेलो होतो आज प्रभू श्रीरामाच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा झाली. त्यामुळे मला खूप आनंद झाला आहे, अशी प्रतिक्रिया कारसेवक वस्तापूर येथील भीमराव येवले यांनी दिली.

# श्रीरामाच्या शोभयात्रेने दुमदुमले दर्यापूर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताकदर्यापूर** – राम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद साजरा करण्यासाठी दर्यापुरातील समस्त नागरिकांनी उत्स्फूर्तपणे आपापल्या घरावर भगवे झेंडे लावत सममंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. यावेळी दर्यापुरातील दाशरथी श्रीराम संस्थेच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली.

तसेच बाभळी परिसरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद साजरा करण्यात आला. दर्यापूर बनोसा वाबळी या तीनही भागातील गल्लोगल्ली नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहावयास मिळाला. संपूर्ण शहर राममय झाले होते. युवकांच्या माध्यमातून बाइक रॅली काढण्यात आली होती. जुन्या दर्यापुरातील दाशरथी श्रीराम मंदिरातून सकाळी आठ वाजता गुढी उभारल्यानंतर भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रा जुन्या दर्यापुरातून फिरवण्यात आली. त्यानंतर श्रीराम मंदिरात रामरक्षा व हनुमान चालिसा पठाण करण्यात आले. बनोसा येथील राम मंदिरात सकाळी हनुमान चालिसा रामरक्षा पठण करण्यात आले, यासह शोभायात्रा काढण्यात आली. उपस्थितांना राम खिचडीचे वाटप करण्यात आले.बाभळी परिसरातील राम मंदिराचा परिसरसुद्धा भगवामय झाला होता. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. संत अच्युत महाराज भवनात राम खिचडीचे वाटप करण्यात आले. विविध ग्रामपंचायत क्षेत्रात महाआरती तथा हनुमान चालिसा पठण करण्यात आले.



## विशेष संपादकीय

*बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि तो थांबवणे आपल्या हाती नाही . मात्र त्या बदलामुळे आपण कसे बदलत जातो आणि त्यातून निर्माण होणारा समाज मात्र संस्कृतीची दशा ठरवीत असतो. या बदलाचे परिणाम सकारात्मक होण्यासाठी दिशा गवसने क्रमप्राप्त ठरते आणि हीच दिशा देण्याचा प्रयन्त बाबासाहेब खापर्डे व्याख्यान मालेतून सतीश फडके यांनी केला. बदललेली संस्कृती सांगत असतांना त्याची दशा फार वाईट झालीय हे वाक्य आपल्यापैकी प्रत्येक जण बोलत असतो कारण आपल्याला त्याची दशा दिसते पण एकदा का त्याची दिशा गवसली तर त्या बदललेल्या संस्कृतीला पण सकारात्मक रूप देता येईल असे फडके सरांना ऐकल्यावर वाटले. प्रत्येकवेळी जून ते सोनं अस म्हणून त्या बुरसटलेल्या गोष्टीना आपण उराशी धरू शकत नाही किंवा जुन ते सगळं टाकाऊ असंही म्हणून चालणार नाही. मग त्यातून आपल्यालाच शोधावं लागेल की टाकाऊ काय आहे , टिकाऊ काय आहे . या बदलत गेलेल्या संस्कृतीचा काही भाग टाकाऊ असेल तर तो टाकल्या गेलाच पाहिजे पण जी संस्कृती आपल्याला माणूस म्हणून जगायला शिकविते ती टाकून नाही चालणार. तिला उराशी बाळगून त्याची पाळेमुळे नवीन पिढीपर्यंत आपल्याला पोहचवावी लागेल. बोलणे , चालणे , शिक्षण , एव्हडच नाही तर कपडे देखिल आपली संस्कृती दाखवतात . बदलत्या काळानुसार कपडे कसे घालावे हा ज्याचा त्याचा चॉईस आहे . आपल्याला कम्फर्टेबल वाटतील असे कपडे नक्कीच घालावे पण ते कपडे घातल्यावर बघणाऱ्याला देखील कम्फर्टेबल वाटावे ही भावना मनात ठेवून केलेला पोशाख ही खरी संस्कृती. डिजिटल इंडिया ही एक संस्कृती आहे पण हे डिजिटलायझेशन होण्यामागची भूमिका लक्षात घेऊन केला गेलेला वापर ही सकारात्मत संस्कृती दर्शविते. अनेक गोष्टी बदलत जातात तशी माणसं बदलतात त्याच वागणं, बोलणं बदलते. पण मी एक समाज घटक आहे माझी माझ्या कुटुंबाप्रति, समाजाप्रती, राष्ट्रप्रति काही कर्तव्य आहेत , एक जबाबदार नागरिक म्हणून माझी या समाजात भूमिका काय आहे हे भान प्रत्येकाला जपणे गरजेचे आहे. संस्कृतीची पाळेमुळे ही कुटुंबातून रुजविल्या जातात त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक जेष्ठाने लहानांची किती चांगल्या प्रकारे जडणघडण होऊ शकेल याकडे जातीने लक्ष देऊन घरातील त्यांचा वावर त्या प्रमाणे असावा. घटस्पोट ही नवीन संस्कृती जन्माला आली आहे .त्यामागील कारण मात्र अतिशय शुल्ककं असते ते जर नवीन पिढीने समजून घेतले तर ही संस्कृतीला लागलेली घटस्फोटाची कीड आपण काढू शकू. नवरा बायको हे अनादी काळापासून असलेलं सुंदर नातं ज्यात रुसवा आहे , भांडण आहे पण त्याच बरोबर प्रेम आहे आणि प्रेम म्हटलं की स्वीकार आलाच. मग कितीही भांडण झाले तरी स्वीकाराचा भाव येतो एकमेकांना माफ करून रोज पुन्हा नव्याने संसार सुरू होतो आणि प्रेमाचा दुसरा प्रतीक म्हणजे माघार घेणे आजच्या नवीन पिढीत नवरा बायको दोघेही पगारी . त्यामुळे हम किसींसे कम नहीं हा अहं भाव येतो कुणी माघार घ्यायला, झुकायला तयार नसते. स्वावलंबी असणे चांगले , नोकरी करणेही उत्तमच पण जर का त्या नोकरीचा पगार डोक्यात गेला त्यातून जन्माला येते ती घटस्पोट संस्कृती. दिवसाघडी बदल होणार पण त्या बदलणाऱ्या संस्कृतीची दशा बघून रडत राहण्या पेक्षा त्याला दिशा कशी देता येईल याचे विचारमंथन होणे अपेक्षित आहे आणि त्यासाठी सक्षम पिढी घडवणारा शिक्षक याने ते दिशा देण्याचे काम करायला हवे असे प्रतिपादन फडके सरांनी केले .अतिशय संवेदनशील विषय पण इतक्या मनोरंजक पद्धतीने त्यांनी मांडला की हसता हसता तो हृदयाला कसा भिडला कळले देखील नाही . हे पसायदान नूतन विदर्भ संस्था द्वारा संचालित महिला महाविद्यालयात बाबासाहेब खापर्डे व्याख्यान मालेच्या शेवटच्या पुष्पात घ्यावयास मिळाले . विचारांची प्रगल्भता असणारे प्राचार्य डॉ अविनाश मोहरील सर व त्याच्या महाविद्यालयाच्या सम्पूर्ण टीम ने इतका छान योग घडवून आणला आणि फडके सरांसारख्या महान वक्त्याला ऐकता आले खूप छान वाटले. रसिकांना साठी ही एक पर्वणी ठरली.*



# श्रीराम प्राणप्रतिष्ठा महोत्सवानिमित्त सुंदरकांड

## पथ्रोट येथे हनुमान चालिसा, महाप्रसादासह विविध कार्यक्रम

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताकपथ्रोट** श्रीराम जन्मभूमी आयोध्यामध्ये श्रीराम प्राणप्रतिष्ठापना तथा मूर्ती स्थापनाच्या पर्वावर पथ्रोट गावातसुद्धा तरीराम मंदिरात भाविक भक्तांकडून दिंडीची नगरप्रदक्षिणा, संगीतमय सुंदरकांड, हनुमान चालिसा पठण, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

बसस्टँडवरील दुभाजकावर लावण्यात आलेल्या स्ट्रीटलाइटच्या प्रत्येक खांबावर भगवे झेंडे लावून संपूर्ण पथ्रोट नगरी भगवामय करण्यात आलेली आहे. गावात शिरणाऱ्या मुख्य रस्त्यापासून ते झेंडा चौकातील हनुमान, श्रीराम मंदिरापर्यंत ठिकठिकाणी भगवे झेंडे, श्रीरामाच्या प्रतिकृती, मोठमोठे बॅनर लावण्यात आले आहे. आजच्या या भक्तिमय कार्यक्रमाला लहानापासून तर मोठ्यांपर्यंत प्रत्येकजण स्वयंस्कृतनि सहभागी झाला होता.एवढेच नव्हे तर गावातील प्रत्येक मंदिरावर रोषणाई करण्यात आली. प्रभू श्रीरामाचे मोठमोठे फोटो लावून त्याची पूजाअर्चा करण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी भक्तांच्या उत्साहात भर घालणारी ठरली आहे. दिवाळी सणाप्रमाणे आज प्रत्येकाच्या घरासमोर रांगोळी, दिव्यांची आरास मांडण्यात आलो होतो. झेंडा चौकातील हनुमान, श्रीराम मंदिरात सुरू असलेल्या या कार्यक्रमाच्या आयोजनात गावक-यांची लक्षणीय उपस्थिती होती.




## हृदय निरोगी ठेवायचंय? 'या' आयुर्वेदिक पद्धतींचा वापर करा

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक** सध्या प्रत्येक जण व्यस्त जीवन जगताना पाहायला मिळत आहे. व्यस्त जीवनशैलीमुळे आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करतो आणि याचा आपल्या आरोग्यावर दिर्घकाळ परिणाम दिसून येतो. याचा सर्वात वाईट परिणाम आपल्या हृदयावर होतो. अलिकडच्या काळात हृदयविकाराचं प्रमाण वाढलं आहे. वृद्धांसोबतच तरुणांमध्येही हृदयविकाराचं प्रमाण वाढताना दिसत आहे. तरुण वयात अनेकांना हृदयविकाराचा झटका उच्च रक्तदाब कोलेस्टेरॉल यासारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अशा वेळी आयुर्वेदानुसार काही नियम आणि पद्धती अवलंबल्यास हृदयविकाराचा धोका बऱ्याच अंशी कमी करता येतो.

सध्याच्या व्यस्त जीवनशैलीमुळे आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे हृदयविकाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहेत. फास्ट फूड, बाहेरचे अन्नपदार्थ, ताणतणाव, अपुरी झोप आणि व्यायामाचा अभाव या कारणांमुळे हृदयविकाराच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. पूर्वी ६०-७० वर्षांच्या वयात होणारे आजार आता ३०-४० वर्षांच्या वयातही दिसून येत आहेत. यामुळे वेळीच तुमच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

हृदयाला निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आहार खूप महत्त्वाची भूमिका बजावते. आयुर्वेदानुसार, आपण आपल्या रोजच्या आहारात हिरव्या पालेभाज्या, ताजी फळे, संपूर्ण धान्य, कडधान्ये आणि काजू यांसारख्या सर्व प्रकारच्या पौष्टिक घटकांचा समावेश केला पाहिजे.

या सर्व गोष्टींमध्ये भरपूर जीवनसत्त्वे,



खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तसेच, अतिरिक्त चरबी, मीठ आणि साखरेचे सेवन मर्यादित असावे कारण यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

चालणे, जॉगिंग, सायकलिंग, योगासने, प्राणायाम यासारखे व्यायाम हृदयासाठी खूप फायदेशीर आहेत. दैनंदिन दिनचर्येत व्यायामाचा समावेश करणे खूप गरजेचं आहे.

दररोज ध्यान आणि योगासने केल्याने मनाला शांती मिळते. यामुळे मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. याशिवाय कुटुंब आणि मित्रांसोबत सकारात्मक वेळ घालवल्याने तणाव दूर राहतो.

# ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (बीबीएनजी) तर्फे नाशिक येथे ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद परिवर्तन

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**– ब्राह्मण व्यावसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (बीबीएनजी) तर्फे ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद परिवर्तन ४ फेब्रुवारी २०२४ रोजी नाशिक येथील गुरुदक्षिणा हॉल येथे होणार असून या परिषदेसाठी जगभरातील नामवंत ब्राह्मण उद्योजक व वक्ते येणार असल्याची माहिती बीबीएनजी चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली.

## उद्यम कौस्तुभ व जीवन गौरव पुरस्कारार्थींची घोषणा

या नामवंत वक्त्यांमध्ये गीतांजली किर्लोस्कर (चेअरपर्सन एम.डी. किर्लोस्कर सिस्टीम (प्रा) लि.), रवींद्र साठे ( चेअरमन - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ) सुनील देवधर (जेष्ठ नेते-भारतीय जनता पार्टी,) डॉ. अशोक जोशी (संस्थापक, मायक्रोलीन एलएलसी, साल्ट लेक सिटी, अमेरिका), योगेंद्र पुराणिक (गॅझेटेड नागरी सेवा अधिकारी, माजी आमदार, जपान), उदय निरगुडकर (संचालक छक्झउ), आनंद गानू अध्यक्ष, गर्ने मराठी ग्लोबल एल एल सी, अमेरिका), गिरीश चितळे (संचालक चितळे डेअरी), डॉ. संजय पैठणकर- दुबई, डॉ. विजय जोशी (ऊठड कन्सल्टिंग, सिडनी, ऑस्ट्रेलिया), संजय लोंढे (अशोक बिल्डकॉन), विश्वास पाठक (संचालक महावितरण) विवेक देशपांडे (रुद्रानी इन्फ्रास्ट्रक्चर), सुमित तिवारी (टायमस), शरयू देशमुख डेल्टा फिनाकेम), अनिल जोशी (जैन इरिगेशन), विष्णू मनोहर (सुप्रसिद्ध शेफ), मंगेश गोंदवले- (व्यवस्थापकीय संचालक, च-खऊउ), अतुल कुर्लेकर(संचालक, लोड स्टार कम्युनिकेशन्स), अभिजित जोग -( सीएमडी, प्रतिसाद अडव्हरटायझिंग,) ही प्रमुख आहेत हे वक्ते उद्योगाशी संबंधित अश्या विविध पैलूंवर संवाद साधतील.या शिवाय दरवर्षी बीबीएनजी तर्फ उद्योगांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांचा गौरव करण्यात येतो. या वर्षी खालीत उद्योजकांना गौरवण्यात येणार आहे.

जीवन गौरव पुरस्कार सीमा किणीकर-(सोलापूर) डॉ. रघुनाथ शुक्ला-(शास्त्रज्ञ, एन सी एल, पुणे)

### उद्यम कौस्तुभ पुरस्कार

कुमार काळे- (नागपूर)
आर्की. प्रज्ञा पोंक्षे- (मुंबई)
रवळनाथ शेंडे- (कराड)
गोविंद झा - (नाशिक)
डॉ.रणजीत जोशी (विम्बल्डन, लंडन व नाशिक)
डॉ. संजय पैठणकर (दुबई)

उद्योजकांचे देशाच्या विकासात मोलाचे योगदान असून देशाचे अर्थकारण व रोजगार निर्मिती मध्ये देखील उद्योजकांची महत्वाची भूमिका असते या परिषदेचा उद्देश व्यवसायाच्या वाढीसाठी विचारमंथन तसेच उद्योजकता विकास असून विविध उद्योजकांना भेटण्याच्या आणि नेटवर्कच्या संधींद्वारे व्यवसाय वृद्धीच्या संधी मिळवणे असा आहे. परिषदेमध्ये नवनवीन उत्पादनांचे लॉचिंग व उद्योजकीय कोशल्यांचे प्रदर्शन देखील होणार आहे. अधिक माहिती साठी ९८२२७५३२२६ येथे संपर्क साधावा असे आवाहन डॉ. अभिजीत वांदे यांनी केले आहे.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# राणा दाम्पत्त्यांकडून उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा कारसेवक म्हणून सत्कार

## कारसेवक श्रीरामाचे हनुमान : फडणवीस



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक हनुमानगढी अमरावती –** कारसेवक व रामभक्तांच्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावरच अयोध्येतील ५०० वर्षाचा कलंक पुसल्या गेला व भव्य श्रीराम मंदिर उभे राहीले. या कार्यात माझाही सहभाग होता. कारसेवक श्रीरामचे हनुमान आहेत, असे गौरवउद्गार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

अमरावती शहरालगतच्या भानखेडा मार्गावरील हनुमान गढी येथे सोमवारी हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्टव्दारा श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त कारसेवकांचा सत्कार, ११ लाख लाडू प्रसाद वितरण व दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. खा. अनिल बोंडे, खा. नवनीत राणा, आ. रवि राणा, चंद्रकुमार जाजोदीया, राजेश मोरडीया, अॅड. वासुदेव नवलानी यांच्यासह अन्य मान्यवर मंडळी हजर होती. फडणवीस पुढे ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय संस्कृती जगमान्य होणार असल्याचे सांगून सर्वांना प्राणप्रतिष्ठेच्या शुभेच्छा दिल्या. उत्तम कार्यक्रम घेतल्याबद्दल त्यांनी राणा दाम्पत्याचे कौतुक केले.

कारसेवा केल्याबद्दल फडणवीस यांचा भावपूर्ण सत्कार राणा दाम्पत्याच्यावतीने करण्यात आला. अन्यही कारसेवकांना सन्मीत करण्यात आले. सामुहीक हनुमान चालिसा पठणाने कार्यक्रमाचे सुरूवात झाली. त्यानंतर लाडू प्रसाद वितरणाचा शुभारंभ झाला. हनुमान गढी येथे उभारण्यात येणार्या १११ फुट भव्य हनुमान मुर्तीच्या चरणाचे पुजन उपमुख्यमंत्र्यांनी केले. येथे दिवसभर झालेल्या कार्यक्रमात शिवमहापुराण कथा यशस्वी करण्यासाठी कार्य करणार्या स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला. संध्याकाळी दिपोत्सव साजरा झाला. दिवसभर महाप्रसादाचे वितरण सुरू होते.

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत माँ गंगा आरती

## दसरा मैदानावर तुषार भारतीय मित्र मंडळाचे आयोजन



### आता ज्ञानव्यापीचा लढा

रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी ५०० वर्षे लढा द्यावा लागला. आज अयोध्येत ती झाल्यानंतर आता ज्ञानव्यापीचा लढा सुरू होणार असून त्यासाठी आता भक्तांनी तयारी करावी, असे आवाहन तुषार भारतीय यांनी या वेळी केले.

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेच्या पाश्र्वभूमीवर येथील भाजप नेते तुषार भारतीय व मित्रमंडळाने माँ गंगा आरतीचे आयोजन केले होते. स्थानिक दसरा मैदान येथे हा सोहळा साधुसंतांच्या उपस्थितीत हजारो राम भक्तांच्या व भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

सायंकाळी काशी येथे दररोज माँ गंगा आरती करण्यात येते. या आरतीचा प्रत्यक्ष अनुभव व लाभ अनेक भाविकांना घेता येत नाही. प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त साधत तुषार भारतीय मित्रमंडळीने सोमवारी सायंकाळी ७.३० ला दसरा मैदानावर माँ गंगा आरतीचे आयोजन केले होते. आरतीस आलेल्या प्रत्येक भक्तास आरती करण्यासाठी पणती व कापूर देण्यात आला होता. या सोहळ्यास आचार्य रणधीर पांडे, आमदार प्रवीण पोटे, आमदार श्रीकांतभारतीय, काली माता मंदिराचे शक्ती महाराज, भाजप नेते तुषार भारतीय, किन्नर आखाड्याच्या आम्रपाली दीदी, महापौर चेतन गावंडे, प्रशांत शेगोकर यांच्यासह हजारो भक्त उपस्थित होते, आरतीनंतर प्रसाद वाटण्यात आला. आरतीस्थळी प्रभू रामचंद्र यांची भव्य मूर्ती व सात व्यासपीठ तयार करण्यात आले होते. सर्वत्र भगवे ध्वज व पताका लावण्यात आल्या होत्या. आरतीपूर्वी रामनामाचा जप करण्यात आला. प्रास्ताविक तुषार भारतीय यांनी, तर न संचालन चेतन गावंडे यांनी केले.

# बडनेऱ्यात गाजला रामलल्ला स्वागतोत्सव

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा:** श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पूर्वसंध्येला बडनेरा राममय झाले. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी बडनेराच्या नव्यावस्तीतील आठवडी बाजारात 'अवध में राम आये है' या. श्रीरामलला स्वागतोत्सवाचे आयोजन केले होते, आमदार प्रवोग पोटे पाटील, जयंत डेहनकर, किरण पातूरकर, प्रा. दिनेश सूर्यवंशी, प्रा. रवींद्र खांडेकर,




समाजसेवक सुदर्शन गांग, जैन संघटनेचे अध्यक्ष प्रदीप जैन, लताताई देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी सचिन गुडे आणि सिम्फनी अर्किस्ट्रा यांनी मराठी व हिंदीतील प्रसिद्ध, जोषपूर्ण श्रीराम गीतांचे सादरीकरण केले. झाकी, आतिषबाजी, महाआरती, प्रसादवितरण असा भरगच्च कार्यक्रमालाउत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# चांदूरबाजार तालुका झाला राममय

## शहरातील सर्वच मंदिरात प्रसाद तर दुधडेअरीत दुधाचे वितरण

## रात्री दीपोत्सवाने व फटाक्याच्या आतिषबाजीने सजले शहर

*__दि.२३विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार –__ अयोध्यातील श्रीराम जन्मभुमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त चांदूरबाजार शहरासह तालुक्यातील मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिरजगाव बंड, रसिकपुर,श्रीराममंदिर,गाडगेनगर चौक,काळा मारोती मंदिर, महाराणा प्रताप चौकासह तालुक्यातील चौकाचौकात प्रसादाचे वितरण करण्यात आले.*



*तर श्रीदुध डेअरी व कन्हैय्या गृहउद्योग यांच्या संयुक्तविद्यमाने किटुकले दाम्पत्यांनी श्रीरामाच्या प्रतिमेचे पुजन करुन १८० लिटर मसाला दुधाचे वितरण केले.तर शहर व तालुक्यात दिवाळी प्रमाणे सर्वदुर फटाक्याची आतीषबाजी करण्यात आली.*

*हनुमान क्रिडा सांस्कृतिक मंडळ,व्यायाम मंडळ व बजरंग दल यांनी संयुक्तपणे सुंदरकाकाडचे आयोजन केले.शहरातील श्रीराम मंदिर तर्फे दिंडी पदयात्रा काढून नगर प्रदक्षणा केली.यात हजारोच्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.*

*सोमवारी रसिकपुर हनुमान मंदिरात व श्रीराम मंदिरात प्रभु श्रीरामाचा अभिषेक,सामुहिक सुंदरकांड करुन शहर व परिसरातील घरोघरी अकराशे किलो बुंदीच्या पाकीटाचे वितरण केले.यावेळी अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले.या ठिकाणी रात्री दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील महादेव मंदिरात श्रीरामाचा जप,श्रीराम रक्षास्त्रोत,महिलांनी भजनाचे आयोजन केले होते.*

*तर श्रीराम मंदिरात कारसेवकांचा सत्कार करण्यात आला.टोम्पे महाविद्यालय चौकातील श्रीसंत गजानन महाराज समीती प्रल्हादपुर तर्फे श्रीरामाचे पुजन,भजन व प्रसादाचे वितरण करण्यात आले व त्या चौकाला गजानन महाराज चौक लोकार्पण करण्यात आले तर प्रल्हादपुर येथील हनुमान मंदिरात भजन,पुजन व प्रसादाचे वितरण करण्यात आले.बजरंगदलाकडून किसान चौकात श्रीरामाचे पुजन करुन फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली व प्रसादाचे वितरण करण्यात आले. संगेकर नगर येथे हनुमान चालीसाचे पठण व प्रसादाचे वाटप करण्यात आले.याशिवाय शहरातील महादेव मंदिर,गजानन महाराज मंदिर,हनुमान मंदिर आदी ठिकाणी धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.ग्रामिण भागातील शिरजगाव बंड येथे माजी मंत्री वसुधाताई देशमुख यांनी उभारलेल्या श्रीराम मंदिरातुन सायंकाळी पाच वाजता श्रीरामाच्या प्रतिमेसह गावातुन भव्य मिरवणुक काढण्यात आली.त्याचा समारोप श्रीराम मंदिरात वसुधाताईंनी स्वत: आरतीत सहभाग घेऊन शेकडो भाविकांना प्रसादाचे वितरण केले. तसेच ग्रामिण परिसरातील माधान , फुबगाव सर्फाबाद,निंभोरा,कोंडवर्धा,हिरुर पुर्णा , कुरळ पुर्णा,देऊरवाडा,ब्राम्हणवाडा थडी,घाटलाडकी सिरजगाव कसबा,आसेगावसह तालुक्यातील ६६ ग्रामपंचायत अंतर्गत येणार्या सर्वच गावखेड्यात सर्वत्र दिवाळी सारखा उत्साह पाहावयास मिळाला.*



# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात श्रीरामाचा जल्लोष

## घरोघरी श्रीराम प्रतिमेचे पूजन, गावोगावी मंदिरांची सजावट व रोषणाई

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर–** अयोध्या येथे श्रीराम यांच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या मुहूर्तावर नांदगाव खंडेश्वर तालुक्यात घरोघरी श्रीराम प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच शहरात श्रीराम मंदिर, गणपती मंदिर येथे पूजन करून महाआरती करण्यात आली. तालुक्यातील खंडाळा, धामक, येवती या गावांमधील श्रीराम मंदिरात महाआरती करण्यात आली, त्यानंतर श्रीराम पालखी काढण्यात आली. श्रीराम मंदिरात आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली तर दुपारी काला करण्यात आला.

नांदगाव खंडेश्वर शहरात श्रीराम मंदिर, गणपती मंदिर, हनुमान मंदिर येथे महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यातआले होते, तर बसस्टैंड परिसरात श्रीरामनवमी उत्सव समितीच्या वतीने आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते बुंदीच्या लाडूचा प्रसाद वाटप करण्यात आला.तालुक्यातील खंडाळा खुर्द येथे सकाळी गावामधून श्री रामलल्ला यांची शोभायात्रा काढून श्रीराम प्राणप्रतिष्ठेचे लाइव्ह प्रसारण गावकऱ्यांना करण्यात आले, तर घमाक येथील श्रीराम शाखाव गावकरी यांच्या वतीने श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम मंदिर येथे करण्यात आले होते. दुपारी मंदिरात आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर कालावाटप करण्यात आला.

### रामलल्ला प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यात अवतरले राम

नांदगाव शहरात सगळीकडे श्रीरामप्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचा आनंद साजरा केल्या जात असताना विजय गणेशोत्सव मंडळ, गणेश मंदिर उत्सव समितीच्या वतीने आयोजित केलेल्या महाप्रसादाच्या वेळी चिमुकला बालक मानस मनोज मानतकर याने श्रीरामाच्या शभूषेत गणपती मंदिरात प्रवेश केला. यावेळी सर्वांनी त्याचे भरभरून कौतुक केले.

# अज्ञात मनोविकृताने तुरीच्या गंजीला आग लावून शेकडो पपईची झाडे कापली

## कीटकनाशक,स्प्रिंकलर पाईप विहिरीत फेकले

## पोलिसांत गुन्हा दाखल, पावणेदोन लाखांचे नुकसान

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** अज्ञात मनोविकृताने एका शेतातील तुरीच्या गंजीला आग लावून बाजूच्या शेतातील पपईची शेकडो झाडे कापून फेकली तसेच शेतातील कीटकनाशक औषध,स्प्रिंकलर पाईप सुद्धा विहिरीत टाकून शेतकऱ्यांचे पावणेदोन लक्ष रुपयांचे नुकसान केले.रविवारी मध्यरात्री संगमेश्वर शेतशिवारात ही घटना घडली.घटनेची नांदगाव पेठ पोलिसांनी नोंद केली असून त्या मनोविकृताचा पोलीस शोध घेत आहे. कोकिळा रमेशराव साकोरे (४७) रा.संगमेश्वरपुरा नांदगाव पेठ,संजय मुळे (५०) बारीपुरा नांदगाव पेठ असे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे नाव आहे. कोकिळा साकोरे यांचे संगमेश्वर शेतशिवारात शेती असून यांच्या शेतात तुरीची गंजी झाकून ठेवण्यात आली होती.शनिवारी मध्यरात्री अज्ञात मनोविकृताने गंजीला आग लावून शेतात असलेले कीटकनाशक औषधी विहिरीत टाकून दिली तर संजय मुळे यांच्या शेतात लावलेले पपई चे शेकडो झाले कुऱ्हाडीने तोडून स्प्रिंकलर पाईप विहिरीत फेकून दिले.यामध्ये शेतकऱ्यांचे पावणे दोन लाखांचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सोमवारी पहाटे शेतकरी मनोज हटवार शेतात गेले असता त्यांना हा प्रकार दिसल्यानंतर त्यांनी तातडीने शेतमालक आणि पोलिसांना याबाबत माहिती दिली. पो.उ.नि मोहन चोखट यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला व अज्ञात आरोपी विरुद्ध भादंवि ४३५,४२७ कलमान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास मोहन चोखट करत आहे.



# हनुमान गढी येथे श्रीराम दिवाळी साजरी

## जिल्ह्यात सर्वत्र आतषबाजी, प्रसाद वितरण, दिव्यांची आरास





**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** अयोध्येत श्रीरामललाच्या प्राणप्रतिष्ठेच्या निमित्याने सोमवारी जिल्ह्यात विविध संघटना, संस्था व मित्र परिवारांनी अनेक ठिकाणी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले होते. जागोजागी भगव्या पताका फडकल्या, रोषणाई होती, चौकाचौकात राज भजन, गीतांचे सुर निनादत होते. प्रसाद वितरण, संध्याकाळी आतषबाजी व दिव्यांची आरास अशा चैतन्य वातावरणात श्रीराम दिवाळी साजरी झाली व जिल्हा राममय झाला.

रविवार संध्याकाळपासूनच वातावरण रम्य झाले होते. सोमवारच्या सकाळपासून शहर व जिल्ह्यातल्या प्रत्येक भागात कार्यक्रम होते. श्रीरामाला वंदन करणारी गाणी जागोगाजी कानावर होती.वातावरणात चैतन्य निर्णय झाले होते. अयोध्येतल्या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण व प्रसाद वाटप अनेक चौक होते. बहुतांश घरावर भगवे झेंडे लावून रोषणाई करण्यात आली होती. संध्याकाळी श्रीराम दिवाळी घरोघरी साजरी झाली. घर व परिसर दिव्यांनी लखलखला होता. जगदिश गुप्ता मित्र परिवाराच्यावतीने शहरातल्या ९० चौकांमध्ये दिड लाख बुंदीच्या लाडूचे प्रसाद वितरण झाले. सांयकाळी दसरा मैदानावर तुषार भारतीय परिवाराच्यावतीने गंगा आरती झाली.

राजकमल चौकात रात्री ९ वाजता श्री बालाजी हनुमान मंदिर, राजकमल चौक मित्र परिवार व श्रीराम नवमी शोभायात्रा समितीतर्फे भव्य महाआरती व प्रसाद वितरण झाले. सराफा बाजार स्थित काळाराम मंदिरामध्ये दुपारी १२.२० वाजता महाआरती व महाप्रसाद वाटप झाले. बजरंग चौक बुधवारा येथे दुपारी महाआरती झाल्यानंतर ५०१ किलो लड्डू प्रसाद वितरीत झाला. श्री नारायण गुरू महाराज चौक भाजीबाजार येथे सायंकाळी महाआरती, दीपोत्सव, आतिषबाजी व प्रसाद वितरण कार्यक्रम झाला. छत्रपती शिवाजी मंडळ व दादा परिवारतर्फे सायंकाळी शोभायात्रा निघाली व त्यानंतर ११०० दिव्यांची आरास करण्यात आली. याशिवाय अमरावती शहरात अनेक मंदिरांमध्ये कार्यक्रम झाले. संध्याकाळी भानखेडा हनुमान गढी येथे श्रीराम दिवाळी साजरी करण्यात आली. आतषबाजी झाली. राणा दाम्पत्य सहभाग घेतला होता.

### हनुमान गढीवर दिपोत्सव

अयोध्येतील प्रभू श्री रामाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर आता सर्वत्र पुन्हा दिवाळी साजरी केली जात आहे. महाराष्ट्रातही ठिकठिकाणी दिपोत्सव केला जात आहे. अमरावतीच्या हनुमान गढीवर खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांनी दिवे लावून आनंदोत्सव साजरा केला. हजारो दिवे लावून परिसर उजळून टाकला. खासदार नवनीत राणा यांनी जय श्री राम व ओम चित्र दिव्यांनी रेखाटले. हजारो दिव्यांनी हनुमानगढी उजाळून गेली होती. तर यावेळी मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करत एकच जल्लोष करण्यात आला.



# अकोल्याहून आला, अमरावतीत चोऱ्या केलेल्या, १७ दुचाकी जप्त



दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती: – अकोला जिल्ह्यातून अमरावतीत येत येथून दुचाकी चोरणाऱ्या सराईत चोरास सिटी कोतवाली पोलिसांनी अटक केली. २१ जानेवारी रोजी त्याच्याकडून ७.७० लाख रुपये किमतीच्या चोरीच्या १७ दुचाकी जप्त करण्यात आल्या. ठाणेदार विजयकुमार वाकसे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. कॉटन मार्केट येथे भाजीपाला घेत असताना आपली दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार संजय तरेकर (५५,उत्कर्ष, नगर) यांनी १३ सप्टेंबर २०२३ रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात नोंदविली होती. त्या गुन्ह्याचा तपास करित असताना ती चोरी संतोष देवराव बोबडे (३८, रा. कुरूम, जि. अकोला) याने केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याआधारे त्याला अटक करून आधी तरेकर यांची दुचाकी ताब्यात घेण्यात आली. चौकशीदरम्यान त्याच्याकडून अन्य ठिकाणांहून चोरलेल्या १६ दुचाकी हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त सागर पाटील, एसीपी शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक विजयकुमार वाकसे यांच्या नेतृत्वात पोलीस निरिक्षक ज्योती विल्हेकर, उपनिरिक्षक एस. एस. चिपडे, एएसआय रंगराव जाधव, अंमलदार मलिक अहेमद, आशिष इंगळेकर, प्रमोद हरणे, पंकज अंभोरे, आनंद जाधव, पुरु फकिरावाले, नरेंद्र उगले यांनी ही कारवाई केली.

# महिला पोलीस अधिकाऱ्यावर महिलेचा हल्ला

## रायटरच्या डोळ्याला नखाने ओरबाडले

### ट्रान्सपोर्टनगर येथील घटना

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** नागपुरी गेट ठाण्यात कार्यरत एका महिला पोलीस अधिकाऱ्यावर एका महिलेनेच हल्ला केला. बचावासाठी पुढे सरसावलेल्या त्यांच्या रायटर अंमलदाराच्या डोळ्याला नखाने ओरबाडले. २० जानेवारी रोजी रात्री एकच्या सुमारास ट्रान्सपोर्टनगर येथे तो प्रकार घडला. याप्रकरणी, जखमी महिला पोलीस अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी संबंधित आक्रमक महिलेविरूध्द सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. २० जानेवारी रोजी रात्री नागपुरी गेट ठाण्यात कार्यरत महिला पोलीस अधिकारी रायटर व चालक अंमलदारांसह पेट्रोलिंग करत होत्या. त्यावेळी २० जानेवारी रोजी उशिरा रात्री एकच्या सुमारास त्यांना २५ ते ३० वर्षे वयोगटातील एक महिला ही तिच्या दुचाकीसह उभी दिसली. त्यामुळे पोलीस अधिकारी महिलेने तिला काही मदत हवी का, अशी विचारणा केली. त्यावर माझ्या गाडीत पेट्रोल नाही. तुम्ही मला काय मदत करणार, येथून निघून जा, असे उध्दटपणे उत्तर दिले. तरीदेखील महिला पोलीस अधिकाऱ्याने तिला स्वत:चा परिचय देत परत तिला मदतीबाबत विचारणा केली. तिला समजाविण्याचा प्रयत्न केला असता तिने महिला अधिकाऱ्या वर हल्ला केला. त्यांच्या रायटरला देखील ईजा पोहचविली. ती ऐकण्याच्या स्थितीत नव्हती.

### नाव, पत्ताही सांगेना

दोन महिला अंमलदार बोलावून तिला पोलीस ठाण्याच्या वाहनात बसण्यास सांगितले असता, तिने पुन्हा वाद करत नकार दिला. अखेर तिला रात्री १.५० च्या सुमारास पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तेथे देखील तिने स्वत:चे नाव सांगण्यास नकार देऊन उडवाउडवीचे उत्तरे दिली. महिला अंमलदारांनी तिला विश्वासात घेऊन तिची ओळख पटविल्यानंतर रूग्णालयात तिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तिने सांगितलेल्या नाव पत्याबाबत शंका आल्याने तिला तिचे आधार कार्ड बाबत विचारणा केली असता तिने आधार कार्ड दिले. त्यावरून तिची खरी ओळख पटली. ती घटस्फोटित असल्याचे देखील समोर आले. तिच्या नातेवाईकांना बोलावून तिला त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले.

# तिवसा तालुका स्तरीय भजन स्पर्धा उत्साहात

## १३५ मंडळांचा सहभाग

### भैय्यासाहेब ठाकुर यांच्या जयंती निमित्त आयोजन




**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** रामचंद्र युवक कल्याण संस्था मोझरी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी द्वारा स्व.भैय्यासाहेब ठाकुर यांच्या जयंती निमित्त अमरावती लोकसभा मतदार क्षेत्रातील जनतेकरीता भव्य महिला पुरूष व बालगट भजन स्पर्धा श्री संत सोटागीर महाराजांच्या नगरी मद्ये श्रिजीत मंगल कार्यालय तिवसा येथे संपन्न झाली महाराष्ट्रातील संताचा खरा विचार जनमानसात पोहचावा ग्रामीण भागातील कलावंतांची दखल व्हावी जनतेचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने भजन स्पर्धेचे आयोजन आमदार यशोमतीताई ठाकुर यांच्या वतीने संपुर्ण जिल्ह्यात करण्यात आले कार्यक्रमालाअध्यक्षा मा. आमदार यशोमतीताई ठाकुर तर प्रमुख अतिथी दर्यापुर मतदार संघाचे आमदार मा.बळवंराव वानखडे माजी जिल्हा परिषद सभापती दिलीपभाऊ काळबांडे काँग्रेस जिल्हा सचिव मुकुंद देशमुख नगराध्यक्ष योगेश वानखडे तिवसा शहर अध्यक्ष सेतू देशमुख नगरसेवक माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रविंद्र राऊत पंचायत समिती सभापती कल्पना दिवे पंचायत समिती सदस्य शिल्पा हांडे सत्तार मुल्ला निलेश खुळे प्रमुख उपस्थित उपस्थित होते यावेळी श्री गुरुदेव सेवा मंडळ व वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ मंडळींचा सत्कार करण्यात आले स्पर्धेत तिवसा तालुक्यातील १३५ महिला पुरुष बाल मंडळांनी सहभाग घेतला येथील ४ मंडळाची अंतिम फेरी साठी निवड करण्यात आली स्पर्धेचे व्यवस्थापन तिवसा नगरपंचायतचे नगरसेवक अमर वानखडे तर स्पर्धेचे परीक्षण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक मा.गोपालजी सालोडकर मा.पराग पदवाड मा.शितल मांडवगणे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ रघुनाथ वाडेकर आभार अमर वानखडे यांनी मानले स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संजय चौधरी मंगेश राऊत गौरव ढोरे सुनील बाखडे अजय बाखडे कल्पना गीरी शिला वाढोनकर सर्व नगरसेवक नगरसेविका नगरपंचायत तिवसा सर्व तिवसा पंचायत समिती सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# अमरावती येथे मराठा उद्योजकांचे महाअधिवेशन थाटात



**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** मराठा सेवा प्रणीत मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्थेच्यावतीने येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात मराठा उद्योजकांचे राज्यस्तरीय महाअधिवेशन रविवारी थाटात पार पडले. यावेळी उद्योग क्षेत्रात भरारी घेणाऱ्या मराठा उद्योजकांनी मुलाखतीत सक्सेस स्टोरी अनुभवातून कथन केली.

अधिवेशनाची सुरूवात मॉ जिजाऊचे वंदन त्यानंतर मॉ जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमा पूजनाने करण्यात आली. अधिवेशनाचे उद्घाटन हावरे ईंजिनिअरींग न्ड बिल्डर्सच्या प्रबंध संचालक उज्ज्वला हावरे यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे होते. यावेळी मंचावर मराठा सेवा संघाचे सर्वेसर्वा पुरूषोत्तम खेडेकर, माजी मंत्री तथा आमदार

प्रवीण पोटे पाटील, मराठा उद्योजक कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश पाटील, मराठा उद्योजक कक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्रसिंह पाटील, मराठा उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष नीलेश ठाकरे, महाअधिवेशन आयोजन समितीचे प्रमुख श्रीकांत मानकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक नीलेश ठाकरे यांनी केले.

दरम्यान उज्ज्वला हावरे यांनी युवकांना उद्योग क्षेत्रात येण्याचे आवाहन केले. मराठा समाज राजकारण, समाजकारणात आघाडीवर आहे, पण उद्योगात कधी पुढे येणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. प्रत्येकाच्या यशामागे एक सक्सेस स्टोरी असते. संघर्ष असते. त्यामुळे युवकांना उद्योग क्षेत्रात आणण्यासाठी त्यांना मार्गदर्शन, प्रेरणा मिळणे काळाची गरज आहे. उद्योग लहान असो वा मोठा यापेक्षा आपले श्रम आणि जिद्द फार महत्वाची ठरणारी आहे. युवकांनी उद्योग उभारणीसाठी पुढे यावे, सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, समारोपीय सत्रात मराठा सेवा संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या हस्ते यशस्वी उद्योजकांना व अधिकाऱ्यांनाही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यावेळी वेगवेगळ्या सत्रात यशस्वी उद्योजकांची मुलाखत घेण्यात आली. मिलिंद देशमुख, प्रभाकर देशमुख, अविनाश पाटील, उज्ज्वल साठे यांनी उद्योग क्षेत्रातील यशाचे अनुभव कथन केले. क्षीप्रा मानकर व सारंग राऊत यांनी उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या. या कार्यक्रमाला आ. प्रवीण पोटे, महापालिका आयुक्त देवीदास पवार, मराठा उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष नीलेश ठाकरे, मराठा सेवासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष अरविंद गावंडे, राजेंद्रसिंह पाटील, श्रीकांत मानकर आदी उपस्थित होते.

# २० लाखांचे हिरेजडित दागिने लंपास तिघींवर संशय

## गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील घटना

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,:** घरातील लाकड़ों कपाटामध्ये ठेवलेले २० लाख रुपये किंमतीचे हिरेजडित मौल्यवान दागिने चोरीस गेले. याप्रकरणात घरकाम करणाऱ्या दोघींसह पत्नीची मैत्रीण, अशा तिथोविरुद्ध संशय व्यक्त करण्यात आला. गाडगेनगर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सहकारनगर येथील निवासी मनीष गोपालदास उधवाणी (वय ३९) हे पत्नीसह लग्नसमारंभात सहभागी होण्यासाठी बाहेरगावी गेले होते. जाण्यापूवों श्री. उधवाणी यांच्या पत्नीने त्यांचे दागिने ज्यामध्ये एक लाख रुपयांचा हिरेजडित हार, सोन्याचे हारसेट ४० ग्रॅम, छोटे हिरेजडित मंगळसूत्र २० ग्रॅम, सोन्याच्या प्रत्येकी १० ग्रॅमच्या ५ चैन ५० ग्रॅम, सोन्याचे ब्रेसलेट ५० ग्रॅम, सोन्याच्या ७० ग्रॅम वजनाच्या सात बांगड्या, सोन्याच्या २० ग्रॅमच्या दोन अंगठ्या, १५ ग्रॅमच्या दोन मोठ्या अंगठ्या, कानातील १० ग्रॅमचे रिंग, कानातील एक डायमंड सेट, असे एकूण २० लाख रुपये किमतीचे दागिने खाकी रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवून सदर पिशवी घरातील लाकडी काटात ठेवून त्याच्या कुलपाचीचावी ही दुसऱ्या पेटीमध्ये ठेवली होती. घरी आल्यानंतर पुन्हा एका कार्यक्रमासाठी श्री. उधवाणी यांच्या पत्नीला जायचे असल्यामुळे त्यांनी दागिने घालण्यासाठी कपाट उघडले असता, त्यात हिरेजडित व सोन्याचे २० लाखांचे दागिने दिसले नाही. दाम्पत्य लग्नाला गेले. त्यापूर्वी काही वेळेसाठी घरात मोलकरीण, तिची मुलगी आणि पत्नीची मैत्रीण, अशा तिघी असल्यामुळे सदर दागिने त्या तिघींनीच चोरले, असा आरोप मनीष उधवाणी यांनी तक्रारीत केला. त्याआधारे पोलिसांनी तिघोहो संशयित महिलांविरुद्ध चोरांचा गुन्हा दाखल केला आहे.

# श्री राम प्राणप्रतिष्ठा सोहळा ऐतीहासिक कार्यक्रमाचा आनंदोत्सव

## सुप्रसिद्ध पांढरी येथे साजरा



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अयोध्या येथे श्रीराम प्राणप्रतिष्ठा हा ऐतिहासीक आनंदोत्सव सोहळा कार्यक्रम पार पडला विशेषत: प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी अयोध्या येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला महर्षी वाल्मिकी नाव देऊन उद्घाटन केले येणेप्रमाणे महर्षि वाल्मिकी भक्तांची मागणी पूर्ण करत महर्षि वाल्मिकी व श्री राम हे आध्यात्मिक नात्या बाबत जुनी संस्कुर्ती भारत देशासमोर जागृत ठेवली या कार्याप्रती गुरूदेव महर्षि वाल्मिकी जयंती समितीचे वतीने त्यांचें जाहिर आभार मानले.मठाचे मठाधिपती श्री. ज्ञानेश्वर महाराज हे अयोध्या येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे पोहचून त्यांनी महर्षी वाल्मिकी आणि श्रीराम नामजप केला. पवित्र रामभूमीला वंदन केले. हा भाग्याचा क्षण आनंदोत्सव देशामद्ये सर्वत्र साजरा होत असतांना आज ता.२२जानेवारी रोजी सुप्रसिध्द पांढरी हनुमान मंदिर येथेराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंदोत्सव गुरुदेव भक्त महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समितीवतीने उमेश ढोणे, एकनाथ वावरे, प्रकाश दंदे, शोभाताई दंदे व असंख्य भक्तांनी श्री राम व रामायण रचियता महर्षि वाल्मिकी यांचें प्रतिमेचे पूजन करून जयघोष केला. वरील समितीकडून निरंतर धार्मिक कार्य सूरूअसलेबाबत उमेश ढोणे, एकनाथ वावरे यांचा सत्कार करण्यात आला.

# वैनगंगा नदीत नाव उलटल्याने सहा महिला बुडाल्या चामोर्शी तालुक्यातील घटना, महिलांचा शोध सुरू

## शोधमोहिमेत एका महिलेचा मृतदेह आढळून आला उर्वरित पाच महिलांचा शोध सुरु

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली**

मिरची तोडणीसाठी मजुरांना घेऊन जाणारी नाव उलटल्याने सहा महिला बुडाल्याची धक्कादायक घटना आज, मंगळवारी ११ वाजताच्या सुमारास चामोर्शी तालुक्यातील गणपूरलगत (रै.) वाहणाऱ्या वैनगंगा नदीत घडली. त्यापैकी एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून पाच महिलांचा अद्यापही शोध लागलेला नाही.



गणपूर रै व परिसरातील महिला चंद्रपूर जिल्ह्यात मिरची तोडणीसाठी जात होत्या. गणपूरहून चंद्रपूरला जाण्यासाठी दळणवळणाची अडचण आहे. त्यामुळे अनेक जण वैनगंगा नदीपात्रात नावेत बसून ये-जा करतात. दरम्यान, २३ जानेवारीला सकाळी नेहमीप्रमाणे सहा महिलांना घेऊन नाव जात होती, पण ऐन मधोमध नदीपात्रात नाव उलटली, त्यामुळे त्यातील सहाही महिला पाण्यात बुडाल्या.

यावेळी नावाडी पाण्याबाहेर पोहून आला, त्याने एका महिलेला वाचविण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. शेवटी तिचे प्रेत आढळले. ते पाण्याबाहेर काढले असून उर्वरित पाच महिलांना शोधण्याचे काम सुरु आहे. या घटनेनंतर चामोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून बचावपथकालाही पाचारण करण्यात आले आहे.

# कोतेगांवच्या नागरिकांचा मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्धार

## सरपंचासह ग्रामस्थ बसले उपोषणाला




**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कोतेगाव रामपुरा येथील ग्रामपंचायत पदाधिकारी व नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र ते कोतेगाव या पोच मार्गाच्या मागणीसाठी अनेकदा लोकप्रतनिधीं व प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून देखील अत्यंत दैनावस्था झालेल्या रस्त्याकडे पूर्णपणे संबंधितांनी पाठ फिरवल्यामुळे सदर मागणीच्या बाबतीत ठोस कार्यवाही होईस्तोवर दिनांक २२ जानेवारी पासून आमरण उपोषण करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

अंजनगाव तालुक्यातील कोतेगाव रामपुर ही गट ग्रामपंचायत असून प्राथमिक आरोग्य केंद्र ते कोतेगाव पर्यंतचा मार्ग हा पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. पावसाळ्यात या मार्गावर पूर्णपणे पाणी साचलेले असते .अशा स्थितीत गावापर्यंत जाणाऱ्या या एकमेव मार्गावरून पायी किंवा दुचाकी वाहनधारकांना चालणे अत्यंत कठीण होते. शाळकरी विद्यार्थ्यासाठी पावसाळ्याचे दिवस मोठी डोकेदुखी ठरते. असे असताना सलग तीन वर्षापासून सदर ग्रामपंचायत च्या वतीने संबंधित विभागाशी व लोकसभा खासदार विधानसभा आमदार यांच्याशी अनेकदा पत्रव्यवहार करून देखील आजतागायत परिस्थिती जैसे थे आहे. त्यामुळे स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी व नागरिकांनी दिनांक २२ जानेवारी पासून कोतेगाव प्लॉट येथे मोठया संख्येने आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.यावेळी उपोषण स्थळी उपोषणकर्ते मध्ये कोतेगाव सरपंच नयना उपाध्ये ,उपसरपंच राजेश वानखडे, सदस्य विनोद बोबडे,मनोज वानखेडे,पुष्पा पानतावणे,सुनीता शिंगणे, सुनीता महले,जयश्री बोबडे,उमा अढाऊ तसेच सुभाष वानखेडे,जीवन वानखेडे, शुधोधन वानखेडे,मनोज पानतावणे ,गौरव महाले,भूषण धनधर्वे, ऋषी बेले,अक्षय वानखडे, संदीप ढोके,पवन शीगणें भूषण वानखेडे,राहुल वानखेडे,अमर मुळे,आशिष शिंगणे ,विकी रायबोले, तेजस चराटे, हृषीकेश वानखेडे, अशिक वानखेडे, शाम बेले अमर वरघट, आदेश शेवाने, क्षेयश शिंगणे, देवानंद वानखेडे, सुधीर डोंगरदिवे , दयाराम वर्घट, शयाम शिंगणे, किसणा रायबोले , कौशिक महाले, सिध्दार्थ वानखेडे, प्रवीन ढोके , बाबू शेवणे आदी उपस्थित होते.

कोतेगाव रामपुरा येथील सरपंच नयना ठाकूरदास उपाध्याय यांचे म्हण्यानुसार याबाबत लोकसभा खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा,आमदार बळवंत वानखडे तथा संबंधित विभागाच्या अधिकारी यांची अनेकदा याबाबत मनधरणी केली मात्र या मागणीकडे सर्वस्तरातून केराची टोपली दाखविण्यात आली. त्यामुळे आम्हा सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच नागरिकांना सदर मागणीच्या पूर्ततेसाठी नाईलाजाने आमरण पोषणाला सुरुवात करावी लागली. त्या पुढे म्हणाल्या मागील दोन दिवसात अमरावती खासदार नवनीत राणा व आमदार बळवंत वानखडे यांच्याकडून प्रश्नाच्या सोडवणुकसाठी आशा होती मात्र अद्याप कोणतेही ठोस आश्वासन अद्याप मिळाले नाही .मात्र जिल्हा परिषद उप अभियंता यांनी काल उपोषण मंडपाला भेट देवून रस्त्याच्या डागडुजी करिता सात लक्ष रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली.असे असले तरी रस्त्याचे नव्याने बांधकाम होईस्तोवर समस्येचे निराकरण होणार नाही तो पर्यंत उपोषण सुरू राहील.प्रसंगी आगामी निवडणुकीत मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्धार पण आम्ही जाहीर करू असे सरपंच म्हणाल्या .

# वेगाचा थरार...., बच्चू कडूंनी शंकरपटात बैल जोडी हाकली

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक बहिरम**



वेगाचा थरार..., बच्चू कडूंनी शंकरपटात बैल जोडी हाकली आमदार बच्चू कडू यांनी शंकरपटात ८ सेकंदात गाठला पल्ला विदर्भातील सर्वात मोठी यात्रा म्हणून प्रसिध्द असलेली बहिरम यात्रेला सुरुवात... यात्रेनिमित्त आमदार बच्चू कडू यांच्याकडून भव्य शंकरपटाचं आयोजन.. बहिरम यात्रेत विदर्भ केसरी जंगी शंकरपट बैलजोडी शर्यतचं आयोजन करण्यात आले.. यावेळी लाखो रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले.. या शंकरपटात राज्यभरातून प्रसिद्ध बैलजोड्या सामील झालेल्या आहे.. यावेळी बच्चू कडू यांनी स्वतः बैलजोडी घेऊन शंकरपटात सहभागी होऊन अवघ्या ८ सेकंदात पल्ला गाठला

# शेतकरी चिंतेत;सोयाबीनच्या दरात घसरण सुरूच

## अमरावती बाजार समितीत ४४९३ रुपये प्रतिक्विंटल भाव



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

यावर्षी सोयाबीनच्या दरात मागील दीड महिन्यांपासून सातत्याने घट होत असून सध्या बाजारात सोयाबीनचे दर ४ हजार ४५० रुपयांपर्यंत खाली आले. सोयाबीनचे दर वाढतील या अपेक्षेने काही शेतकऱ्यांनी सोयाबीनची विक्री केली नव्हती, मात्र भाव वाढण्याऐवजी कमी होत आहेत. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत २० जानेवारी रोजी ६ हजार ७८९ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४ हजार ४५० तर कमाल ४ हजार ५३६ म्हणजे सरासरी ४ हजार ४९३ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. १५ जानेवारीला सोयाबीनला अमरावती बाजार समितीत सरासरी ४ हजार ५५६ रुपये दर मिळाला होता.

या वर्षी सोयाबीनचे उत्पादनही अपेक्षित झालेले नाही. पावसात खंड पडल्यामुळे सोयाबीन पिकाची फारशी वाढ झाली नाही. ऐन फुलोरावस्थेत पीक असताना पावसाने दांडी मारल्यामुळे सोयाबीनचे अपेक्षित उत्पादन आले नाही. शिवाय बी-बियाणे, कीटकनाशके, मशागत आणि शेतमजुरीचे वाढलेले दर पाहता सोयाबीनने शेतकऱ्याला फारसे काही हातात लागू दिलेले नाही. एकरी दोन क्विंटलपासून उत्पादन झाले. हंगामात गरजेपुरते सोयाबीन विक्रीला काढून उर्वरित सोयाबीन भविष्यात भाव वाढतील या आशेने शेतकऱ्यांनी साठवून ठेवले. पण सध्या सोयाबीनचे बाजारभाव पाच हजारांवर गेलेले नाहीत. त्यामुळे नाइलाजास्तव शेतकरी सोयाबीन विकण्याच्या तयारीत आहे.व्यापाऱ्यांनी सुद्धा हंगामात सोयाबीन साठा करून ठेवला आहे. खासगी पतसंस्था किंवा बँकांचे कर्ज उचलून वेअर हाउसमध्ये व्यापाऱ्यांनी सोयाबीन साठवलेले आहे. आज या सोयाबीनमध्ये लाखो रुपये व्यापाऱ्यांनी गुंतवून ठेवले आहेत. बँकांचे व्याज बघता आणि सोयाबीन बाजाराचा कल पाहता व्यापारीसुद्धा द्विधा मनःस्थितीत आहेत.मागील एक ते दीड महिन्यापासून कापसाच्या दरातही घसरण सुरू आहे. कापूस निघाला त्यावेळी बाजारात ७ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव होता. समोर भाव वाढतील, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र वाढण्याऐवजी दर झपाट्याने घसरले आहे. सध्या कापसाचे दर ६ हजार ६०० ते ६ हजार ७२५ रुपये उत्तम दर्जाच्या कापसाला तर पावसामुळे भिजलेल्या कापसाला तर ६ हजार २०० ते ६ हजार ३०० इतकाच भाव मिळतो आहे. पावसामुळे कपाशीच्या उत्पादनातही घट आली तसेच अनेक भागात बोंडअळीचा प्रकोपही झाला होता, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अवघ्या दोन वेच्यानंतर उलंगवाडी केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी यंदा उत्पादनात घट व भाव कमी झाल्यामुळे आर्थिक अडचणीत आले आहेत.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे १० विद्यार्थ्यांची आर. डी. सी. कॉँक्रिट प्रा. ली. कंपनी मध्ये निवड

## निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून ४.३६ लाखाचे पॅकेज

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप ने द्वारा विद्यार्थ्यांकरिता सातत्याने कॅम्पस ड्राईव्ह चे सत्र २०२३-२०२४ मध्ये आयोजन करून विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करीत आहे. पी आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट च्या ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभागाद्वारे आर. डी. सी. कॉँक्रिट प्रा. ली. या प्रख्यात कंपनीचा ओपन कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन नुकताच करण्यात आले होते. ज्यामध्ये अमरावती व नागपूर युनिव्हर्सिटीच्या सिविल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल तसेच एम. बी. ए च्या एकूण ४०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला यावेळी विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक भावना आणि क्षमता दिसून आली. कंपनीद्वारे घेण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिये नंतर एकूण १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. ज्यामध्ये आदर्श जामनिक, साक्षी गायकवाड, हरीश काळे, कोमल सदानशिव,सौरभ गायकवाड, रुतिशा पाटील,मिनाक्षी तिवारी, जुनेद खान, मयूर मोहोड, साक्षी सोंडकर यांचा समावेश आहे. या निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना कंपनीच्या वतीने ४. ३६ लाखाचे पॅकेज मिळाले आहे.

महाविद्यालयातील कोअर ब्रँचेस करीता सातत्याने कोअर कंपनीचे कॅम्पस ड्राइव्ह आयोजित केले जातात . इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सिव्हिल आणि एमबीए यासह विविध शाखेतील विद्यार्थ्यांना लक्ष्य करणाऱ्या कॅम्पस ड्राईव्हचा उद्देश RDC Concrete India Pvt Ltd च्या विविध गरजांसाठी सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांची नियुक्ती करणे हा आहे.पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप या युवकांना रोजगार देणारा अग्रणीय ग्रुप आहे. सातत्याने इंजिनीरिंग, एम. बी. ए. तसेच एम. सी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात कॅम्पस ड्राईव्हज चे आयोजन केले जात आहे. या मध्ये विविध बहुराष्ट्रीय कंपनीज जसे टी. सी. एस., कॅप्जेमिनी, कॉग्निझंट, ऍसेनचर, विप्रो, झेन्सार, इन्फोसिस, पर्सिस्टन्ट, एल अँड टी इन्फोटेक, इन्फोसेप्ट, पॅरेन्ट पे, कोलाबेरा, ग्लोबल लॉजिक, टेक महिंद्रा, केपीआयटी, एच. सी. एल., ग्लोबलीया सॉफ्ट, एडीपी, सम्यक इन्फोटेक, सेलेबल टेकनॉलॉजिज, डीएसपीएल, निओसोफ्ट, आरवाडे इन्फ्रास्ट्रक्चर, विप्रो पारी प्रा. लि., आर. डी. सी. कॉँक्रिट प्रा. ली. ,परफीशीयंट, डी मार्ट, श्रीराम फायनान्स या व इतर कंपनीज चा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या कॅम्पस प्लेसमेंट मध्ये सहाय्यक असणारे सर्व प्रकारचे ट्रैनिंग विद्यार्थ्यांना फिनिशिंग स्कूल द्वारे सर्वांना मोफत दिले जाते. ज्या मध्ये अँटिट्यूड, रिसोनिंग, इंग्लिश कम्युनिकेशन, ग्रुप डिस्कशन, रीझुम तयार करणे तसेच इंटरव्हिव्ह ची तयारी अंतर्भूत आहे. विद्यार्थ्यांना इंजिनीरिंग च्या फर्स्ट इयर पासूनच कॅम्पस रिक्रुटमेंट चे ट्रेनिंग दिले जाते.

सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन्स , विभागप्रमुख, संपूर्ण टिचिंग व नॉन टिचिंग स्टाफ द्वारे अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या कॅम्पस ड्राईव्ह च्या यशस्वी नियोजनासाठी ट्रैनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख प्रा. मोनिका जैन, ट्रैनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रशांत ठोंबरे , प्रा. सुहास पवार, प्रा. सचिन जळीत, प्रा. मनीष वालेचा, डॉ. संजीव सिंग व संपूर्ण ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या टीम चे मोलाचे सहकार्य मिळाले तसेच सर्वांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# तीर्थक्षेत्र आष्टा येथे भिकाजी महाराज जन्मोत्सवला सुरुवात

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे**

अल्पावधीतच महाराष्ट्रातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान व विदेही संत म्हणून ख्याती असलेल्या तालुक्यातील तीर्थक्षेत्र आष्टा येथील संत भिकाजीं महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्या सुरुवात झाली असून दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी होत आहे.

तालुक्यातील वर्धा नदीच्या तीरावर असलेल्या संत भिकाजी महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे भक्तांचे श्रद्धास्थान ठरत आहे. विदेही संत भिकाजी महाराज यांचा जन्मोत्सव मागील अनेक वर्षांपासून साजरा केला जातो. २२ जानेवारी पासून या जन्मोत्सवाला सुरुवात झाली असून २९ जानेवारी पर्यंत हा उत्सव साजरा केला जात आहे. यामध्ये कलश स्थापना करून दैनंदिन हरिपाठ, श्री ची आरती व भजन कीर्तनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहे.सात दिवसात कैलास महाराज लोखंडे यांचे सुमधुर सुरातून संगीतमय भागवत कथेला भाविकांची गर्दी वाढली आहे.यासोबत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मागील ६ दशकाच्या पूर्वीचा काळ कुळाकाठीच्या घरांची गाव, त्यात २९जानेवारी १९५४ साली या अवलिया संतांचा जन्म झाला व कुटुंबाने दिलेले 'नारायण' हे नाव घेऊन तो मोठा होत गेला. काही वर्षे सामान्य जीवन जगणारा 'नारायण' वर्ग ७ ची परीक्षा पास करून कबड्डी पटू सुद्धा झाला.त्यानंतर एक दैवीय करामत घडली व एकाएकीच नारायणाला स्वतःतील परमेश्वरी शक्तीचा अनुभव आला व त्यावेळी मात्र त्याचा 'नारायण' नसून भिकाजी महाराज म्हणून भक्तांना साक्षात्कार झाल्याचे भाविक भक्तांकडून बोलल्या जाते.विदेही संत भिकाजी आजही भौतिक सुखापासून विमुख आहेत तर मूलभूत गरजेचे त्यांना भान नाही.तेव्हापासून आजवर लाखो भाविक भक्तांना त्यांची प्रचिती आली असून त्यांचा जन्मोत्सव साजरा केला जात आहे.

# नितीन कदम यांचा स्तुत्य उपक्रम : वैराग्यमूर्ती गाडगे महाराज यांच्या विचारावर आधारित अनेक वर्षांपासून अविरत सेवा



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गेल्या कित्येक वर्षापासून नितीन कदम यांची सामाजिक सेवा संपूर्ण विदर्भात प्रचलित आहे. आज त्यांच्या दिव्याग बांधव मदत उपक्रमात पाचशेचा आकडा ओलांडला असताना पूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.भातकुली येथिल दिव्याग बांधवांस अत्याधुनिक नवतंत्रज्ञानयुक्त सायकल प्रदान करतं दिव्यांगांना स्वयंचलित उपकरणे वाटपाची पाचशेचा आकडा गाठून नवा कीर्तीमान रचला आहे.बडनेरा ग्रामीण भागातील सर्वसमावेशक समाजाचा दृष्टीकोन तयार करणे, दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांचे सक्षमीकरण आणि सन्माननीय जीवन सुनिश्चित करणे हा या कार्यक्रमाचा आयोजन करण्यामागील हेतू आहे. दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देणे, त्यांना उत्पादक, सुरक्षित आणि सन्माननीय जीवन जगण्याची संधी देणे हा या मागचा मुख्य नितीन कदम यांचा उद्देश आहे.लाभार्थ्यांना स्वावलंबी बनवणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाकलित करण्यासाठी सक्षम बनवणे हा या सहाय्यक उपकरणांचा उद्देश आहे.नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने अपंगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठीनितीन कदम यांच्या जाहीर 'संकल्प' योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी ते नेहमी आग्रही असतात. या गोष्टीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची आवश्यकता आहे.दिव्यांग व्यक्तींसाठी विविध संकल्प बहुद्देशीय संस्थेमार्फत नितीन कदम यांच्या नेतृत्वात लाभ मिळवून देऊन त्यांचे जीवनमान उंचावणेसाठी उपक्रम राबविण्याचे काहीं वर्षाआधी निश्चित झाले होते. दरम्यान आत्तापर्यंत त्यांनी पाचशेहून अधिक दिव्यांग् बांधवांना स्वयंचलित नवतंत्रज्ञानयुक्त सायकली वाटप करून सर्वांची मने जिंकली. यावेळी माजी नगरसेवक शफीभाई, गणेश काळे नामदेव डगावाळे विनोद पतालिया निलेश लड्डा इजराइल शहा,बशीर भाई,प्रवीण मिसाळ,वासुदेव तिडके,मयूर देशमुख,किशोर जोगी,प्रफुल महल्ले,मोहन भातुकलकर,गजानन धनवाडे,सुभाष बांते,बांशिभाऊ लाठी,बाबुलाल वानखडे,पांडूरंग बगाडे, शेख अहमद शेख अमिद, मोहम्मद अमिफभाई काजी, शब्बीर भाई अकबर, बशीर शेख करीम, हमीद शेख सत्तार, अनिस खान, समीर मोहम्मद, इलियान दानिश, फहीम शेख हसन, दानिश, परवेझ, गणेश काळे, हबिद शेख रशीद व ईतर नागरिक उपस्थित होते.